# 13

# नियम आणि ग्राहक सल्ला

| प्रकरणाचे घटक | पाठ्यक्रम शिकण्याची निष्पत्ती |
|---|---|
| क सरकारची भूमिका | 13.2 |
| ख महत्वाच्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय विमा संस्था | 13.3 |
| ग आयआरडीए आणि इतर नियामकांची कर्तव्ये, अधिकार आणि कार्ये | 13.1 |
| घ आयआरडीए (विमा एजंटना परवाना) नियम 2000 | 13.1 |
| **शिकण्याची उद्दिष्टे** | |
| या प्रकरणाच्या अभ्यासानंतर तुम्हाला खालील गोष्टी करता आल्या पाहिजेत:<br>• विमा उद्योगाच्या विकासासाठी भारत सरकारने पार पाडलेल्या भूमिकेचे वर्णन करणे;<br>• विमा उद्योगातील विविध भारतीय आणि आंतरराष्ट्रीय विमा संस्थांच्या भूमिकांची रुपरेषा देणे;<br>• विमा नियामक म्हणून आयआरडीएची कर्तव्ये, अधिकार आणि कार्ये समजावून सांगणे;<br>• आयआरडीए (विमा एजंटना परवाना) नियम 2000 च्या महत्वाच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करणे. | |

## ओळख

आपल्या अभ्यासादरम्यान आपण विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आयआरडीए) विषयी आधीच पाहिले आहे आणि याआधीच्या प्रकरणामध्ये **विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आयआरडीए) कायदा 1999 द्वारे** त्याची

स्थापना कशी करण्यात आली हे पाहिले. भारतामध्ये आयआरडीए विमा नियामक आहे आणि पॉलिसीधारकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी तसेच विमा उद्योगाचे नियमन, प्रसार आणि शिस्तबद्ध विकास होण्यासाठी त्याची स्थापना करण्यात आली हे आपल्याला माहित आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आयआरडीएची कर्तव्ये, कार्य आणि अधिकार कोणते आहेत हे आपण पाहू. या प्रकरणामध्ये आम्ही तुम्हाला विमा एजंटना परवाना देणे आणि त्याचे नूतनीकरण करणे यांचा समावेश असलेल्या **आयआरडीए (विमा एजंटना परवाना देणे) नियम 2000** ची ओळख करुन देऊ.

भारतामध्ये विम्याचा प्रसार आणि विस्तार होण्यामध्ये भारत सरकार आणि इतर महत्वाच्या संस्थांच्या भूमिकेविषयी आपण सुरुवातीला जाणून घेऊ.

| **महत्वाचे शब्द** | | | |
|---|---|---|---|
| या प्रकरणामध्ये खालील शब्द आणि संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे: | | | |
| विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आयआरडीए) | थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय) | जीवन विमा महामंडळ (एलआयसी) | भारतीय ॲक्चुअरी संस्था (आयएआय) |
| भारतीय विमा ब्रोकर संघटना (आयबीएआय) | भारतीय विमा प्रशिक्षण संस्थान (आयआयआय) | दर सल्लागार समिती (टीएसी) | दर नियंत्रण-मुक्त करणे (डी-टेरिफिकेशन) |
| आयआरडीए (विमा एजंटना परवाना देणे) नियम 2000 | परवाना रद्द करणे | व्यावहारिक प्रशिक्षण | परवाना देणे |
| आचारसंहिता | परवान्याची दुसरी प्रत | | |

## क) सरकारची भूमिका

सरकार सर्व कायद्यांचा मूळ स्त्रोत असल्यामुळे भारतातील विमा उद्योगाचे नियमन करण्यात सरकारची महत्वाची भूमिका आहे. उद्योगाचे योग्यप्रकारे नियमन व्हावे याची खात्री करण्यासाठी कारवाई करण्याचे अधिकार सरकारला आहेत आणि भारतभर विम्याच्या प्रसाराला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार वेळोवेळी पावले उचलते.

**क)1 आयआरडीएचे अधिकार काढून घेण्याचा केंद्रसरकारचा अधिकार**

आयआरडीए कायदा 1999 ने भारताच्या केंद्र सरकारला अधिसूचनेद्वारे आयआरडीएचे अधिकार काढून घेण्याचा अधिकार दिला आहे. सरकारला असे वाटले की आयआरडीए आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडू शकत नाही (आयआरडीच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांमुळे), किंवा नियामकाने आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडलेल्या नाहीत किंवा सार्वजनिक हितासाठी अशी पावले उचलणे आवश्यक ठरले तर सरकार आपला अधिकार वापरु शकते.

**क)2 केंद्र सरकारचे आयआरडीएशी नाते**


आयआरडीए कायद्यामध्ये केंद्र सरकारची आयआरडीए संबंधी काय भूमिका आहे हे स्पष्ट करण्यात आले आहे. आपण त्याचा खालील प्रकारे सारांश देऊ शकतो:

- संसदेने मंजुरी दिल्यानंतर आयआरडीएला कायद्यातील हेतू पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले अनुदान देणे.
- आयआरडीएच्या वार्षिक हिशेबाचे लेखापरीक्षण करणे आणि भारताच्या महालेखापालांकडून (कॉम्प्ट्रोलर अँड ऑडिटर जनरल ऑफ इंडिया) त्याचे प्रमाणीकरण करुन घेऊन केंद्र सरकारला सादर करणे. त्यानंतर केंद्र

सरकार या लेखा परीक्षणाचे निवदेन संसदेच्या दोन्ही सभागृहात सादर करेल.

- तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींशिवाय धोरणात्मक प्रश्नांबाबत केंद्र सरकार आयआरडीएला निर्देश देऊ शकते. केंद्र सरकार असे निर्देश वेळोवेळी लिखित स्वरुपात देऊ शकते आणि आयआरडीए त्यांचे पालन करण्यास बांधील आहे.
- विमा उद्योगाच्या प्रसार आणि विकासासाठी प्रस्तावित किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यक्रमासंदर्भातील परतावे, निवेदने आणि इतर विवरण केंद्र सरकारला गरजेनुसार वेळोवेळी पुरवणे आवश्यक आहे.
- कायद्यातील तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करण्याचा केंद्र सरकारला अधिकार आहे आणि ते एका अधिसूचनेद्वारे असे करु शकते.

**आकृती 13.1 आयआरडीए आणि केंद्र सरकार दरम्यानचे नाते**




**क)3 उद्योगाच्या वाढीत सरकारची भूमिका**

विमा उद्योगाच्या वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकार वेळोवेळी विविध तरतूदी करते. विमा क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीला परवानगी देणे ही केंद्र सरकारने केलेल्या महत्वाच्या तरतूदींपैकी एक आहे. याला थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय) असे म्हणतात.

**क)3(क) थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय)**

भारतामध्ये 2000 पर्यंत जीवन विमा महामंडळाला (एलआयसी) जीवन विमा व्यवसायात व्यवहार करण्याचा विशेषाधिकार होता.

विम्यामध्ये मोठ्या भांडवलाची गरज लागते आणि भांडवली खर्च भरुन निघण्यास वेळ लागतो आणि त्यासाठी विशेष ज्ञानाची गरज असते. जेव्हा सरकारला विमा क्षेत्र खाजगी सहभागासाठी खुले करायचे होते तेव्हा या संभाव्य भागीदारांकडे तांत्रिक नैपुण्य नव्हते किंवा विमा व्यवसायासाठी आवश्यक भांडवल नव्हते. त्यामुळेच विमा बाजारपेठ खाजगी सहभागासाठी सहजपणे खुली करता यावी आणि उद्योगाची शिस्तबद्ध वाढ व्हावी यासाठी सरकारने विमा क्षेत्रात 26% थेट विदेशी गुंतवणुकीला (एफडीआय) मंजुरी दिली.

**जाणून घ्या**

सध्याच्या विम्यासाठीच्या एफडीआय कायद्यानुसार स्थानिक खाजगी कंपन्या विदेशी भागीदारासोबत भागीदारी करु (जॉईंट व्हेंचर) शकतात ज्यामध्ये विदेशी भागीदाराचा हिस्सा 26% असू शकतो.

विमा क्षेत्र खाजगी सहभागासाठी 2000 पासून खुले केल्यानंतर, देशात विम्याच्या विस्तारात बरीच सुधारणा झाली आहे. नाविन्यपूर्ण आणि गरजा पूर्ण करणाऱ्या विशेष उत्पादनांमुळे हप्त्यांचे दरही स्पर्धात्मक झाले आहेत, त्यामुळे ग्राहकांचाच फायदा झाला आहे. ही वाढ कायम ठेवण्यासाठी विमा क्षेत्रातील

विदेशी गुंतवणुकीची मर्यादा वाढवून 49% करण्याचा केंद्र सरकारचा प्रस्ताव आहे. या संदर्भातील विधेयक हे प्रकरण लिहीले जात असतांना संसदेच्या मंजुरीची वाट पहात आहे. या विधेयकाला मंजुरी मिळाल्यानंतर विदेशी भागीदाराला स्थानिक भागीदारासोबतच्या भागीदारीतील त्यांचा हिस्सा 49% पर्यंत वाढवता येईल. तुम्ही याबाबतच्या घडामोडींवर लक्ष ठेवावे.

**सुचवण्यात आलेला उपक्रम**

पाच खाजगी जीवन विमा कंपन्यांची यादी तयार करा आणि इंटरनेट वरुन आणि कंपनीच्या उत्पादनांविषयीच्या माहितीपत्रावरुन या कंपन्यांच्या भागीदारीचे स्वरुप कसे आहे हे शोधा. या भागीदारीमध्ये स्थानिक भागीदाराचा आणि विदेशी भागीदाराचा वाटा किती आहे हे शोधा.

**क)3(ख) आयकर प्रोत्साहन सवलती**

आपण आधीच्या प्रकरणांमध्ये लोकांनी जीवन विम्यांमध्ये गुंतवणूक करावी यासाठी सरकार कशा विविध कर सवलती देते हे पाहिले आहे. यामुळे भारतात जीवन विमा घेण्याचे प्रमाण आणि विम्याचा विस्तार वाढला आहे.

**प्रश्न 13.1**

आयआरडीए आपली कार्ये पार पाडू शकत नसल्याचे केंद्र सरकारला वाटल्यास ते काय करु शकते?

# ख) महत्वाच्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय विमा संस्था

भारतीय विमा उद्‌योगामध्ये अतिशय महत्वाची भूमिका पार पाडणाऱ्या महत्वाच्या संस्था आपण या विभागात पाहणार आहोत.

**ख)1 विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आयआरडीए)**

आपण प्रकरण 1 मध्ये पाहिले की मल्होत्रा समितीच्या शिफारशींनंतर विमा उद्योगाचे नियमन आणि विकास करण्यासाठी 1999 साली विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. स्पर्धेला प्रोत्साहन देणे ज्यामुळे ग्राहकाला जास्त पर्याय मिळतील आणि हप्त्यांचे दर स्पर्धात्मक असतील आणि त्याच वेळी विमा बाजारपेठेच्या आर्थिक सुरक्षिततेची खात्रीही करणे यांचा आयआरडीएच्या मुख्य उद्दिष्टांमध्ये समावेश होतो. भारतातील विमा आणि पुनर्विमा उद्यागाचे नियमन, प्रसार आणि शिस्तबद्ध वाढ करण्याची आयआरडीएची जबाबदारी आहे.

**जाणून घ्या**

एप्रिल 2000 मध्ये आयआरडीएची संवैधानिक संस्था म्हणून स्थापना करण्यात आली.

या प्रकरणामध्ये आपण आयआरडीएची कर्तव्ये, अधिकार आणि कार्ये पाहणार आहोत.

**ख)2 जीवन विमा सल्लागार मंडळ (काउन्सिल)**

**विमा कायदा 1938** च्या कलम 64ए अंतर्गत जीवन विमा सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यकारी समिती आणि काही उप-समित्यांद्वारे ते कार्य करते आणि भारतातील सर्व जीवन विमा कंपन्यांचा त्यामध्ये समावेश होतो. उद्योगाच्या वतीने ते सरकार, आयआरडीए आणि जनता यांच्याशी सर्व चर्चा पुढे नेते आणि समन्वय करते. थोडक्यात हा जीवन विमा उद्योगाचा चेहरा आहे.

भारतातील जीवन विमा उद्योगाला विकासाच्या प्रवासात एक अतिशय उत्साही, भरवशाची आणि नफा देणारी आणि लोकांना मदत करणारी सेवा देणारा उद्योग

बनविण्यासाठी महत्वाची आणि पूरक भूमिका पार पाडणे हे जीवन विमा सल्लागार मंडळाचे उद्दिष्ट आहे.

जीवन विमा सल्लागार मंडळाची कार्ये पुढील प्रमाणे आहेत:

- नैतिकता आणि प्रशासनाचा उच्च दर्जा राखणे.
- उद्योगाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे आणि ग्राहकांचा विश्वास वाढवणे.
- जीवन विम्याची भूमिका आणि फायद्यांबद्दल जागरुकता निर्माण करणे.
- सरकार, कायदे बनविणारे आणि नियामक यांच्यात स्वतः पुढाकार घेऊन मुद्देसूद चर्चा आयोजित करणे.
- जीवन विम्यामध्ये संशोधन करुन या क्षेत्राच्या विकासात भर घालणे.
- आर्थिक सेवा क्षेत्रातील इतर संस्थांशी संवाद साधण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून कार्य करणे.
- विम्याचे शिक्षण, प्रशिक्षण आणि परिषदा आयोजित करण्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडणे.
- सदस्यांना आवश्यक असेल तेव्हा मदत आणि मार्गदर्शन देणे.
- भारतीय जीवन विमा उद्योग आणि जागतिक बाजारपेठ यातील सक्रिय दुवा बनणे.

**ख)3 सर्वसाधारण विमा सल्लागार मंडळ (काउन्सिल)**

सर्वसाधारण विमा सल्लागार मंडळ भारतातील सर्वसाधारण विमा कंपन्याच्या (जीवनेतर) एकत्रित हिताचे प्रतिनिधित्व करते. सल्लागार मंडळ सामाईक हिताच्या विषयांवर बोलते आणि धोरणे तयार करण्यासाठीच्या चर्चांमध्ये

सहभागी होते आणि विमा उद्योगातील ग्राहक सेवेच्या सर्वोच्च दर्जाचे समर्थन करते.

**ख)4 भारतीय विमा ब्रोकर संघटना (आयबीएआय)**

भारतीय विमा ब्रोकर संघटना ही भारतातील सर्व परवानाधारक विमा ब्रोकरांची आयआरडीएची मान्यता असलेली सर्वोच्च संस्था आहे. आयआरडीएने विमा ग्राहकांच्या हिताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि त्यांना सेवा देणाऱ्या विमा ब्रोकरना भारतीय बाजारात आणले. विमा ब्रोकरला विमा कंपनीकडून मोबदला मिळत असला तरी ते विमा कंपनीचे नाही तर विमा खरेदी करणाऱ्याचे प्रतिनिधित्व करतात.

**जाणून घ्या**

विमा ब्रोकरकडून पॉलिसी घेण्यासाठी पॉलिसीधारकाला अतिरिक्त किंमत द्यावी लागत नाही.

**ख)5 भारतीय ॲक्चुअरी संस्था (आयएआय)**

भारतीय ॲक्चुअरी संस्थेची (आयएआय) (पूर्वीची ॲक्चुरिअल सोसायटी ऑफ इंडिया- एएसआय) 1944 साली स्थापना करण्यात आली आणि 1979 साली तिची आंतरराष्ट्रीय ॲक्चुअरी संघटनेची सदस्य म्हणून नोंदणी झाली.

**जाणून घ्या**

ॲक्चुअरी हा गणित आणि संख्याशास्त्राच्या पद्धती वापरुन विम्यामध्ये विशिष्ट घटनांशी किती जोखीम निगडित असते याचे मूल्यमापन करणारा तज्ज्ञ असतो. उदाहरणार्थ प्रकरण 4मध्ये आपण ॲक्चुअरींनी जीवन विमा कंपन्यांसाठी मृत्यूदर कोष्टक कसे बनवले हे पाहिले. ॲक्चुअरी हा भारतीय ॲक्चुअरी संस्थेचा (आयएआय) सभासद हवा.

आयएआय सुरु करण्यामागे खालील उद्दिष्टे होती.

- ॲक्चुअरी व्यवसायाला भारतात चालना देणे;
- व्यवसायाच्या सदस्यांमधील संवाद वाढवण्यासाठी संधी देणे;
- संबंधित विषयावरील संशोधनाला मदत करणे आणि त्या विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करणे; आणि
- ॲक्चुअरीच्या परीक्षेसाठी तयारी करणाऱ्यांना सुविधा आणि मार्गदर्शन देणे.

**ख)6 दर सल्लागार समिती (टीएसी)**

विमा कायदा 1938च्या कलम 64यू अंतर्गत सर्वसाधारण विमा व्यवसायासंदर्भात, दरावर तसेच विमाकर्त्यांनी दिलेले फायदे, अटी आणि नियम यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्याचे नियमन करण्यासाठी, दर सल्लागार समितीची (टीएसी) स्थापना करण्यात आली. त्यानुसार पूर्वीच्या बऱ्याच विमा उत्पादनांचे दर हे टीएसीने सुचवेल्या दरावर आधारित होते.

जीवनेतर विमा उद्योगासाठी आयआरडीएने टीएसीची माहिती संग्राहक म्हणून नियुक्ती केली आहे.

आयआरडीए टप्प्या टप्प्याने विमा उत्पादनांचे दर नियंत्रण-मुक्त (डी-टेरिफिकेशन) करत आहे, जीवनेतर विम्याच्या काही वर्गांसाठी ही प्रक्रिया पूर्ण झाली असून इतर वर्गांसाठी मात्र पूर्ण झालेली नाही.

**जाणून घ्या**

दर **नियंत्रण-मुक्त (डी-टेरिफिकेशन)** करणे म्हणजे विमाकर्ता जोखीमेच्या मूल्यमापनानुसार, बाजारभावाप्रमाणे उत्पादनाचा दर ठरवू शकतो, त्यांच्यावर आता विशिष्ट दर लादले जात नाहीत.

विमा उत्पादनांच्या दरावर आता टीएसीचे नियंत्रण नसले तरीही टीएसीने तयार केलेल्या प्रमाणभूत धोरणाचा वापर विमाकर्ते अजूनही करतात.

**ख)7 भारतीय विमा प्रशिक्षण संस्थान (आयआयआय)**

विमा संस्थांचा महासंघ म्हणून 1955 मध्ये भारतीय विमा प्रशिक्षण संस्थानाची स्थापना करण्यात आली आणि 1987 साली तिचे आयआयआय म्हणून नामकरण करण्यात आले. भारतात विमा शिक्षण आणि प्रशिक्षणाचा प्रसार करणे हा या संस्थेचा हेतू आहे. आयआरडीएसह खाजगी आणि सार्वजनिक विमा कंपन्या अशा विमा उद्योगातील सर्व घटकांशी संस्थानाचा जवळचा संबंध आहे.

संस्थान विविध पातळीवरच्या परीक्षा घेते आणि कॅनडा, अमेरिका, ब्रिटनमधील इतर आंतरराष्ट्रीय विमा संस्थांसह चार्टर्ड विमा संस्थेसोबत काम करते (खाली पहा)

**ख)8 राष्ट्रीय विमा अकादमी (एनआयए), पुणे**

सरकारने 1980 साली एलआयसी, जीआयसी आणि सार्वजनिक क्षेत्रातील चार विमाकर्त्यांच्या मदतीने एनआयएची स्थापना केली. पुण्यातील एनआयएचे मुख्य उद्दिष्ट विमा प्रशिक्षणाठी अभ्यासक्रम तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे, ज्यामध्ये कार्यकारी अधिकारी, प्रशिक्षक आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, संशोधन, व्यवस्थापन आणि संज्ञापनाच्या कार्यात समाविष्ट करुन घेतले जाते. विमा आणि जोखीम व्यवस्थापनाच्या क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण, शिक्षण, सल्लागार संस्था, प्रकाशन आणि नेतृत्व विकास यासाठीची ही सर्वोच्च संस्था आहे. ज्ञानवर्धक विकास कार्यक्रमांद्वारे एनआयएने अनेक दर्जेदार विमा व्यवसायिकांना तयार केले आहे.

**ख)9 चार्टर्ड विमा संस्था (सीआयआय)**

चार्टर्ड विमा संस्थेची (सीआयआय) ब्रिटनमध्ये 1912 साली रॉयल चार्टरद्वारे स्थापना करण्यात आली, या संस्थेचे 150 देशांमध्ये 95,000 हून अधिक सदस्य असून ही जगातील सर्वात मोठी विमा आणि आर्थिक सेवा व्यावसायिक संस्था आहे. सीआयआय जागतिक व्यावसायिक दर्जा स्वीकारला जाण्यास बांधील आहे. स्थानिक नियामक, प्रशिक्षण संस्था आणि उद्योगातील संस्थांसोबत काम करुन स्थानिक बाजारपेठेत काम करणाऱ्या विमा आणि आर्थिक सेवा कर्मचाऱ्यांची आणि एजंटांची व्यावसायिकता, कौशल्य आणि वागणूक सुधारण्याचा ती प्रयत्न करते.

**ख)10 विमा आणि जोखीम व्यवस्थापन संस्था (आयआयआरएम) हैदराबाद**

विमा जोखीम आणि व्यवस्थापन संस्था (आयआयआरएम) ही आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण आणि संशोधन संस्था आहे. ही संस्था आयआरडीए कायदा 1999 च्या कलम 14(एफ) नुसार, विमा आणि जोखीम व्यवस्थापनाच्या आंतरराष्ट्रीय पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमाचा (नियमित आणि पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम) प्रसार करण्यासाठी 2002 साली आयआरडीए आणि आंध्र प्रदेश राज्य सरकारने संयुक्तपणे स्थापना केली.

विमा क्षेत्रातील आधुनिक काळातील आव्हानांसंदर्भात उदयोन्मुख बाजारपेठांच्या प्रशिक्षण आणि विकासासंदर्भातील गरजा पूर्ण करणे हा आयआयआरएमचा उद्देश आहे.

**प्रश्न 13.2**

जीवन विमा सल्लागार मंडळाची कार्ये कोणती आहेत?

# ग) आयआरडीए आणि इतर नियामकांची कर्तव्ये, अधिकार आणि कार्ये

## ग)1 आयआरडीए

आयआरडीए कायदा 1999 च्या कलम 14 मध्ये आयआरडीएची कर्तव्ये, अधिकार आणि कार्ये स्पष्ट करण्यात आली आहे. आयआरडीए कायद्याने आयआरडीएला खालील अधिकार दिले आहेत:

| | |
|---|---|
| क) | अर्जदारांना (कंपनी) नोंदणीचे प्रमाणपत्र देणे आणि या नोंदणीचे नूतनीकरण, सुधारणा, काढून घेणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे; |
| ख) | पॉलिसीचे बेचनपत्र देणे, पॉलिसीधारकांचे नामनिर्देशन, विमाहित, विम्याचे दावे निकाली काढणे, पॉलिसीचे समर्पण मूल्य आणि विमा करारातील इतर अटी आणि नियमांसंदर्भात पॉलिसीधारकांच्या हिताचे रक्षण करणे; |
| ग) | मध्यस्थ आणि एजंटसाठी आवश्यक पात्रता, आचारसंहिता आणि व्यावसायिक प्रशिक्षण निर्दिष्ट करणे; |
| घ) | सर्व्हेक्षक आणि हानी मूल्यांकक यांच्यासाठी आचारसंहिता निर्दिष्ट करणे; |
| च) | विमा व्यवसायाची कार्यक्षमता वाढवणे; |
| छ) | विमा आणि पुनर्विमा व्यवसायाशी संबंधित व्यावसायिक संस्थांची मदत करणे आणि नियमन करणे; |
| ज) | कलम (छ) मध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यावसायिक संस्थांना मदत आणि नियमन करण्यासाठीच्या योजनांना निधी देण्यासाठी विमा कंपन्यांकडून हप्त्यामधून मिळणारे उत्पन्न किती टक्के असावे हे स्पष्ट करणे; |
| झ) | या कायद्याचे हेतू पूर्ण करण्यासाठी शुल्क आणि इतर मूल्य आकारणे; |

| | |
|---|---|
| ट) | विमा व्यवसायातील विमा कंपन्या, मध्यस्थ आणि इतर संबंधित संस्था यांच्याकडून माहिती मागवणे, त्यांचे निरीक्षण आणि चौकशी करणे आणि त्यांचे लेखापरीक्षण तसेच तपासणी करणे; |
| ठ) | विमाकर्त्यांचे सर्वसाधारण विमा व्यवसायासंदर्भातील दराचे, फायदे, अटी आणि नियमांचे नियंत्रण आणि नियमन करणे ज्यांवर विमा कायदा 1938 (विभाग ख6 पहा) च्या 64यू कलमानुसार दर सल्लागार समितीचे (टीएसी) नियंत्रण नाही किंवा ज्यांचे नियमन करण्यात आलेले नाही; |
| ड) | विमा कंपन्यांनी आणि मध्यस्थांनी हिशेबाच्या नोंदवह्या ज्या स्वरुपात आणि ज्या पद्धतीने ठेवाव्यात आणि ज्या स्वरुपात हिशेबाचे निवेदन सादर केले जावे हे स्पष्ट करणे; |
| ढ) | विमा कंपन्यांद्वारे निधीच्या गुंतवणुकीचे नियमन करणे; |
| ण) | कायद्यानुसार प्रत्येक विमा कंपनीला दावे चुकते करण्यासाठी जी पुरेशी रक्कम राखून ठेवावी लागते (सॉल्व्हंसी) तिचे नियमन करणे (टीप: सॉल्व्हंसी सीमा म्हणजे विमा कंपनीची संपत्ती तिच्या जबाबदाऱ्यांपेक्षा जास्त असण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम); |
| त) | विमा कंपनी आणि मध्यस्थांदरम्यानच्या वादांचा निवाडा करणे; |
| थ) | दर सल्लागार समितीच्या (टीएसी) कार्याची देखरेख करणे (विभाग ख6 पहा); |
| द) | विमा कंपनीने ग्रामीण किंवा सामाजिक क्षेत्रामध्ये किती टक्के जीवन विमा व्यवसाय किंवा सर्वसाधारण विमा व्यवसाय करावा हे स्पष्ट करणे; आणि |
| ध) | आवश्यक असलेल्या इतर अधिकारांचा वापर करणे. |

### ग)2 भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय)

भारतीय रिझर्व्ह बँक ही भारताची केंद्रीय बँक आहे आणि **भारतीय रिझर्व्ह बँक कायदा 1934** च्या तरतूदींनुसार 1 एप्रिल 1935 साली तिची स्थापना करण्यात आली. आरबीआय ही भारतातील आर्थिक यंत्रणेची नियामक, निरीक्षक आणि

आर्थिक अधिकार असलेली संस्था आहे. ती बँक क्षेत्रातील व्यवहारांसाठी मार्गदर्शक तत्व तयार करते ज्याअंतर्गत देशातील बँकिंग आणि आर्थिक यंत्रणा चालवल्या जातात. आरबीआय देशाचे आर्थिक धोरण तयार करते, राबवते, त्याचे निरीक्षण करते आणि मूल्य स्थैर्य राखले जाईल याची खात्री करते.

**ग)3 सेक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी)**

**सेक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया कायदा 1992 च्या तरतूदींनुसार** 12 एप्रिल 1992 रोजी सेबीची स्थापना करण्यात आली. सेबी भारतातील भांडवली बाजाराची नियामक आहे आणि ती भांडवली बाजारात गुंतवणूक करणाऱ्या सर्व गुंतवणुकदारांच्या हिताचे संरक्षण करते. वेळोवेळी भांडवली बाजाराचा प्रसार आणि विकासासाठी आवश्यक असलेली योग्य पावले उचलण्याची जबाबदारीही सेबीची असते.

**प्रश्न 13.3**


आयआरडीएची मुख्य उद्दिष्टे कोणती आहेत?

## घ) आयआरडीए (विमा एजंटना परवाना देणे) नियम 2000

आयआरडीएने जुलै 2000 साली **विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (विमा एजंटना परवाना देणे) नियम** लागू केला. कायद्याचा हा भाग विमा एजंटना परवाना देणे आणि त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण याच्याशी संबंधित असल्याने तुमच्यासाठी तो जाणून घेणे महत्वाचे आहे.

**घ)1 एजंट बनणे**

तुम्हाला जीवन विमा एजंट बनायचे असेल तर बऱ्याच गोष्टी कराव्या लागतील आणि काही निकष पूर्ण करावे लागतील.




## घ)1(क) निवेदन अर्ज

ज्या व्यक्तीला विमा एजंट म्हणून काम करायचे असेल त्याने **नियम 3 मध्ये** स्पष्ट करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यास निर्देशित स्वरुपात निवेदन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. **नियम 7** मध्ये स्पष्ट करण्यात आल्याप्रमाणे निवेदन अर्जासोबत संस्थेच्या नावे 250 रुपयांचे शुल्क जोडणे आवश्यक आहे.

**घ)1(ख) पात्रता**

**नियम 4** मध्ये स्पष्ट करण्यात आल्याप्रमाणे अर्जदाराकडे खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे:

| **अर्जदार शेवटच्या जनगणनेनुसार 5,000 किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ठिकाणी रहात असेल** |
|---|
| • किमान 12वी उत्तीर्ण हवा, किंवा<br>• मान्यताप्राप्त शिक्षण मंडळ किंवा संस्थेद्वारे एखादी समकक्ष परीक्षा दिलेली असावी. |

| **अर्जदार दुसरीकडे रहात असेल** |
|---|
| • किमान 10वी उत्तीर्ण हवा, किंवा<br>• मान्यताप्राप्त शिक्षण मंडळ किंवा संस्थेद्वारे एखादी समकक्ष परीक्षा दिलेली असावी. |

**घ)1(ग) व्यावहारिक प्रशिक्षण**

**नियम 5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे** अर्जदाराने व्यावहारिक प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. परवान्यासाठी पहिल्यांदा अर्ज करताना, अर्जदाराने मान्यताप्राप्त संस्थेमध्ये 50 तासांचे (संमिश्र एजंसी घ्यायची असल्यास 75 तासांचे) जीवन विमा व्यवसायाचे व्यावहारिक प्रशिक्षण पूर्ण करायला हवे. मात्र अर्जदाराकडे अतिरिक्त शैक्षणिक पात्रता (उप-नियम (1) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे) असेल तर व्यावहारिक प्रशिक्षणाची आवश्यकता थोडी शिथिल केली जाते.

**घ)1(घ) परीक्षा**

**नियम 6** अंतर्गत अर्जदाराला जीवन विमा व्यवसायासाठीची निवड-पूर्व परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागते. ही परीक्षा भारतीय विमा प्रशिक्षण संस्था (आयआयआय) किंवा इतर कुठल्याही मान्यताप्राप्त परीक्षा संस्थेकडून घेतली जाऊ शकते.

**घ)1(च) परवाना देणे**

अर्जदाराने खालील बाबींची पूर्तता केल्याची खात्री पटली तर विनिर्दिष्ट पदाधिकारी व्यक्ती त्याला परवाना देऊ शकते:

- नियम 4ची पूर्तता केली आहे (योग्य शैक्षणिक पात्रता आहे);
- नियम 5ची पूर्तता केली आहे (व्यावहारिक प्रशिक्षण पूर्ण केले आहे);
- नियम 6ची पूर्तता केली आहे (आवश्यक परीक्षा उत्तीर्ण झाला आहे);
- पूर्णपणे भरलेला निवेदन अर्ज सादर केला आहे;
- विमा व्यवसाय मागण्यासाठी आणि मिळवण्यासाठी आवश्यक ते सर्व ज्ञान आहे; आणि
- पॉलिसीधारकांना आवश्यक त्या सर्व सेवा देण्याची क्षमता आहे.

**घ)1(छ) परवान्याचे नुतनीकरण**

**नियम 5(3)** मध्ये स्पष्ट करण्यात आल्याप्रमाणे विमा एजंटला त्याच्या परवान्याचे नूतनीकरण करायचे असेल तर अर्जदाराने मान्यताप्राप्त संस्थेमध्ये जीवन विमा व्यवसायाचे 25 तासांचे व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे.

**घ)1(ज) परवाना रद्द करणे**

कायद्याच्या कलम 42 मधील उप-कलम(4) मध्ये नमूद करण्यात आलेल्या अपात्रतेसंबंधी कुठल्याही बाबी एजंटला लागू असतील तर विनिर्दिष्ट पदाधिकारी व्यक्ती विमा एजंटचा परवाना रद्द करु शकते.

वैयक्तिक एजंटच्या अपात्रतेसंदर्भात उप-कलमांतर्गत खालील बाबी नमूद करण्यात आल्या आहेत:

- व्यक्ती सज्ञान नाही.
- न्यायालय किंवा सक्षम अधिकाऱ्याने व्यक्तिची मानसिक स्थिती योग्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.
- गुन्हेगारी गैरवापर, परम सद्भावाचे उल्लंघन, फसवणूक, धोका देणे किंवा न्यायालयाच्या कार्यकक्षेचा अपमान करुन अशा प्रकारांना मदत करणे किंवा असे प्रकार करणे.
    - मात्र अशा प्रकारच्या गुन्ह्यासाठी देण्यात आलेली शिक्षा पूर्ण होऊन पाच वर्षे उलटली असतील तर सामान्यपणे केवळ दोषी ठरणे हे अपात्रतेचे कारण राहत नाही.
- व्यक्ती विमाकर्ता किंवा विमाधारकांविरुद्धच्या कुठल्याही फसवणुकीत, अप्रामाणिकपणा करण्यात किंवा चुकीचे प्रतिनिधित्व करण्यात जाणीवपूर्वक सहभागी झाल्याचे आढळून आल्याबद्दल दोषी ठरला.
- व्यक्तिकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता नाही किंवा त्याने नियमाप्रमाणे 12 महिन्यांपर्यंतचे आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केलेले नाही.
- व्यक्तिने आचारसंहितेचे उल्लंघन केले आहे (विभाग घ2 पहा)

**प्रश्न 13.4**

नव्या जीवन विमा एजंटला किती तासांचे व्यावहारिक प्रशिक्षण घ्यावे लागते?

**घ)1(झ) परवान्याची दुसरी प्रत देणे**

परवाना हरवला, नष्ट झाला किंवा फाटला तर पदाधिकारी 50 रुपये शुल्क घेऊन दुसरी प्रत देऊ शकतात.

**घ)1(ट) परवान्याशिवाय काम करणे**

परवाना न घेता काम करणाऱ्या विमा एजंला 500 रुपयांचा दंड भरावा लागेल.

**घ)2 एजंटची आचारसंहिता**

परवान्याच्या नियमांव्यतिरिक्त नियामकांनी प्रत्येक विमा एजंटसाठी आचारसंहिता लागू केली आहे. आपण प्रकरण 15 मध्ये आचार संहितेविषयी चर्चा करु.

**प्रश्न 13.5**

विमा एजंट बनण्यासाठी तुम्ही कुठली पावले उचलणे आवश्यक आहे?

**महत्वाचे मुद्दे**

**सरकारची भूमिका**

- आयआरडीए कायदा 1999 केंद्रसरकारला आयआरडीएचे अधिकार एका अधिसूचनेद्वारे काढून घेण्याचा अधिकार देतो.
- केंद्र सरकारला आयआरडीएला तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींसोडून इतर धोरणांच्या प्रश्नांवर वेळोवेळी लिखित स्वरुपामध्ये निर्देश देण्याचा अधिकार आहे.
- सध्याच्या कायद्यानुसार सरकारने विमा क्षेत्रात 26% थेट विदेशी गुंतवणुकीला परवानगी दिली आहे.
- लोकांनी विम्यामध्ये गुंतवणूक करावी यासाठी सरकार त्यांना विविध प्रोत्साहन कर सवलती देते.

## विमा क्षेत्रातील महत्वाच्या भारतीय संस्था

- जीवन विमा सल्लागार मंडळ (एलआयसी) सरकार, आयआरडीए आणि जनता यांच्यात चर्चा घडवून आणते आणि त्यांच्यात समन्वय घडवून आणते. ते जीवन विमा उद्योगाचा चेहरा आहे.
- आयबीएआय ही आयआरडीएने मान्यता दिलेली भारतातील सर्व परवानाधारक विमा ब्रोकरांची सर्वोच्च संस्था आहे.
- भारतातील ॲक्चुअरी व्यवसायाला चालना देणे हे भारतीय ॲक्चुअरी संस्था (आयएआय) चे लक्ष्य आहे.
- सर्वसाधारण जीवन विमा व्यवसायातील विमाकर्त्यांच्यां उत्पादनांचे दर, फायदे, अटी आणि नियम यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांचे नियमन करण्यासाठी टीएसीची स्थापना करण्यात आली होती.
- भारतातील विमा शिक्षण आणि प्रशिक्षण यांचा प्रसार करण्यासाठी आयआयआयची स्थापना करण्यात आली.
- सीआयआय स्थानिक नियामक, शैक्षणिक भागीदार आणि उद्योगातील संस्था यांच्यासोबत स्थानिक बाजारपेठेत काम करणारे विमा आणि आर्थिक सेवा क्षेत्रातील कर्मचारी आणि एजंटची व्यावसायिकता, कौशल्य आणि वागणूक सुधारण्यासाठी, काम करते.

## आयआरडीए आणि इतर नियामकांची कर्तव्ये, अधिकार आणि कार्ये

* विमा उद्योगाचे नियमन आणि विकास करण्यासाठी आयआरडीएची एक स्वायत्त संस्था म्हणून स्थापना करण्यात आली होती.

* आयआरडीए कायदा 1999 च्या कलम 14मध्ये आयआरडीएची कर्तव्ये, अधिकार आणि कार्ये स्पष्ट करण्यात आली आहेत

* विमा आणि पुनर्विमा व्यवसायाचे नियमन, प्रसार आणि शिस्तबद्ध वाढ करणे हे आयआरडीएचे कर्तव्य आहे.

**आयआरडीए (विमा एजंटना परवाना) नियम 2000.**

- प्राधिकरणाने जुलै 2000 मध्ये विमा एजंटना परवाना देणे आणि त्याचे नूतनीकरण करण्यासाठी आयआरडीए (विमा एजंटना परवाना देणे) नियम लागू केले.
- एजंट होण्यासाठी अर्जदाराने व्यवस्थित भरलेला निवेदन अर्ज आणि शुल्क विनिर्दिष्ट पदाधिकारी व्यक्तिकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याची शैक्षणिक पात्रता योग्य हवी, त्यांनी आवश्यक प्रशिक्षण पूर्ण करणे आणि परवाना दिला जाण्यापूर्वी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**प्रश्नोत्तरे**

13.1

केंद्र सरकारला असे वाटले की आयआरडीए आपली कार्ये पार पाडू शकत नाही, आयआरडीच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांमुळे किंवा नियामकाने आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या सातत्याने पार पाडल्या नसतील तर सरकारला आयआरडीएचे अधिकार काढून घेण्याचा अधिकार आहे. सरकार एका अधिसूचनेद्वारे असे करु शकते.

13.2

जीवन विमा सल्लागार मंडळाची कार्ये खालील प्रमाणे आहेत:

1. नैतिकता आणि प्रशासनाचा उच्च दर्जा राखणे.
2. उद्योगाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे आणि ग्राहकांचा विश्वास वाढवणे.
3. जीवन विम्याची भूमिका आणि फायद्यांबद्दल जागरुकता निर्माण करणे.
4. सरकार, कायदा बनविणारे-लोकप्रतिनिधी आणि नियामक यांच्यादरम्यान स्वतः पुढाकार घेऊन मुद्देसूद चर्चा आयोजित करणे.
5. जीवन विम्यामध्ये संशोधन करुन या क्षेत्राच्या विकासात भर घालणे.
6. आर्थिक सेवा क्षेत्रातील इतर संस्थांशी संवाद साधण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून कार्य करणे.
7. विम्याचे शिक्षण, प्रशिक्षण आणि परिषदा आयोजित करण्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडणे.
8. सदस्यांना आवश्यक असेल तेव्हा मदत आणि मार्गदर्शन देणे.
9. भारतीय जीवन विमा उद्योग आणि जागतिक बाजारपेठ यातील सक्रिय दुवा बनणे.

13.3

स्पर्धेला प्रोत्साहन देणे ज्यामुळे ग्राहकाला जास्त पर्याय मिळतील आणि हप्त्यांचे दर स्पर्धात्मक असतील आणि त्याच वेळी विमा बाजारपेठेच्या आर्थिक सुरक्षिततेची खात्रीही करणे यांचा आयआरडीएच्या मुख्य उद्दिष्टांमध्ये समावेश होतो.

13.4

नव्या जीवन विमा एजंटला 50 तासांचे प्रशिक्षण घ्यावे लागते मात्र त्याच्याकडे अतिरिक्त शैक्षणिक पात्रता असेल तर त्यामध्ये थोडी सवलत दिली जाते.

13.5

तुम्हाला विमा एजंट व्हायचे असेल तुम्हाला बरीच पावले उचलावी लागतील आणि बरेच निकष पूर्ण करावे लागतील.

1. तुम्हाला निवेदन अर्ज सांगितलेल्या स्वरुपात (नियम 3) 250 रुपये शुल्कासहित (नियम 7) विनिर्दिष्ट पदाधिकारी व्यक्तीकडे सादर करावा लागेल.
2. तुमच्याकडे शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे: तुम्ही 5,000 किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या भागात रहात असाल तर किमान 12वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असले पाहिजे किंवा इतरत्र रहात असाल (नियम 4) तर 10वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असले पाहिजे.
3. तुम्ही 50 तासांचे व्यावहारिक प्रशिक्षण घेतले पाहिजे (तुमच्याकडे अतिरिक्त शैक्षणिक पात्रता असेल तर कमी) (नियम 5).
4. जीवन विमा व्यवसायाची निवड-पूर्व परीक्षा तुम्हाला उत्तीर्ण व्हायला हवी (नियम 6)
5. तुम्ही वरील सर्व गोष्टींची पूर्तता केली असेल आणि तुमच्याकडे आवश्यक ते सर्व ज्ञान आणि विमा व्यवसाय मागण्याचे आणि मिळवण्याचे तसेच पॉलिसीधारकांना आवश्यक त्या सेवा पुरविण्याचे कौशल्य असेल तर तुम्हाला परवाना दिला जाईल.

**स्वयं-चाचणी प्रश्न**

1. विमा एजंटसाठी किमान पात्रता काय?
2. आयआरडीएचे सात अधिकार आणि कार्ये स्पष्ट करा?
3. आयआरडीए कायदा 1999 मध्ये स्पष्ट करण्यात आल्याप्रमाणे केंद्र सरकारची भूमिका काय आहे?
4. सध्या भारतात विम्यामध्ये किती थेट विदेशी गुंतवणुकीला परवानगी आहे?

**तुम्हाला उत्तरे पुढील पानावर मिळतील**

- अर्जदाराकडे नियम 4मध्ये स्पष्ट करण्यात आल्या प्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता हवी. अर्जदार 5,000 किंवा अधिक लोकसंख्येच्या (शेवटच्या जनगणनेनुसार) ठिकाणी रहात असेल तर 12 वी किंवा मान्यता प्राप्त शिक्षण मंडळाची किंवा संस्थेची समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असायला हवा. अर्जदार इतरत्र रहात असेल तर 10 वी किंवा मान्यता प्राप्त शिक्षण मंडळाची किंवा संस्थेची समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असायला हवा.
- तुमच्या उत्तरामध्ये खालील पैकी सात मुद्द्यांचा समावेश हवा

| | |
|---|---|
| क) | अर्जदारांना (कंपनी) नोंदणीचे प्रमाणपत्र देणे आणि या नोंदणीचे नूतनीकरण, सुधारणा, काढून घेणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे; |
| ख) | पॉलिसीचे बेचनपत्र देणे, पॉलिसीधारकांचे नामनिर्देशन, विमाहित, विम्याचे दावे निकाली काढणे, पॉलिसीचे समर्पण मूल्य आणि विमा करारातील इतर अटी आणि नियमांसंदर्भात पॉलिसीधारकांच्या हिताचे रक्षण करणे; |
| ग) | मध्यस्थ आणि एजंटसाठी आवश्यक पात्रता, आचारसंहिता आणि |

| | |
|---|---|
| | व्यावसायिक प्रशिक्षण निर्दिष्ट करणे; |
| घ) | सर्व्हेक्षक आणि हानी मूल्यांकक यांच्यासाठी आचारसंहिता निर्दिष्ट करणे; |
| च) | विमा व्यवसायाची कार्यक्षमता वाढवणे; |
| छ) | विमा आणि पुनर्विमा व्यवसायाशी संबंधित व्यावसायिक संस्थांची मदत करणे आणि नियमन करणे; |
| ज) | कलम (छ) मध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यावसायिक संस्थांना मदत आणि नियमन करण्यासाठीच्या योजनांना निधी देण्यासाठी विमा कंपन्यांकडून हप्त्यामधून मिळणारे उत्पन्न किती टक्के असावे हे स्पष्ट करणे; |
| झ) | या कायद्याचे हेतू पूर्ण करण्यासाठी शुल्क आणि इतर मूल्य आकारणे; |
| ट) | विमा व्यवसायातील विमा कंपन्या, मध्यस्थ आणि इतर संबंधित संस्था यांच्याकडून माहिती मागवणे, त्यांचे निरीक्षण आणि चौकशी करणे आणि त्यांचे लेखापरीक्षण तसेच तपासणी करणे; |
| ठ) | विमाकर्त्यांचे सर्वसाधारण विमा व्यवसायासंदर्भातील दराचे, फायदे, अटी आणि नियमांचे नियंत्रण आणि नियमन करणे ज्यांवर विमा कायदा 1938 (विभाग ख6 पहा) च्या 64यू कलमानुसार दर सल्लागार समितीचे (टीएसी) नियंत्रण नाही किंवा ज्यांचे नियमन करण्यात आलेले नाही; |
| ड) | विमा कंपन्यांनी आणि मध्यस्थांनी हिशेबाच्या नोंदवह्या ज्या स्वरुपात आणि ज्या पद्धतीने ठेवाव्यात आणि ज्या स्वरुपात हिशेबाचे निवेदन सादर केले जावे हे स्पष्ट करणे; |
| ढ) | विमा कंपन्यांद्वारे निधीच्या गुंतवणुकीचे नियमन करणे; |
| ण) | कायद्यानुसार प्रत्येक विमा कंपनीला दावे चुकते करण्यासाठी जी पुरेशी रक्कम राखून ठेवावी लागते (सॉल्व्हंसी) तिचे नियमन करणे (टीप: सॉल्व्हंसी सीमा म्हणजे विमा कंपनीची संपत्ती तिच्या जबाबदाऱ्यांपेक्षा जास्त असण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम); |
| त) | विमा कंपनी आणि मध्यस्थांदरम्यानच्या वादांचा निवाडा करणे; |
| थ) | दर सल्लागार समितीच्या (टीएसी) कार्याची देखरेख करणे (विभाग ख6 |

| | |
|---|---|
| | पहा); |
| द) | विमा कंपनीने ग्रामीण किंवा सामाजिक क्षेत्रामध्ये किती टक्के जीवन विमा व्यवसाय किंवा सर्वसाधारण विमा व्यवसाय करावा हे स्पष्ट करणे; आणि |
| ध) | आवश्यक असलेल्या इतर अधिकारांचा वापर करणे. |

3. आयआरडीएच्या कायद्यामध्ये केंद्र सरकारची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे तिचा सारांश खालीलप्रमाणे आहे:

- संसदेने मंजुरी दिल्यानंतर आयआरडीएला कायद्यातील हेतू पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले अनुदान देणे.
- आयआरडीएच्या वार्षिक हिशेबाचे लेखापरीक्षण करणे आणि भारताच्या महालेखापालांकडून (कॉम्ट्रोलर अँड ऑडिटर जनरल ऑफ इंडिया) त्याचे प्रमाणीकरण करुन घेऊन केंद्र सरकारला सादर करणे. त्यानंतर केंद्र सरकार या लेखा परीक्षणाचे निवदेन संसदेच्या दोन्ही सभागृहात सादर करेल.
- तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींशिवाय धोरणात्मक प्रश्नांबाबत केंद्र सरकार आयआरडीएला निर्देश देऊ शकते. केंद्र सरकार असे निर्देश वेळोवेळी लिखित स्वरुपात देऊ शकते आणि आयआरडीए त्यांचे पालन करण्यास बांधील आहे.
- विमा उद्योगाच्या प्रसार आणि विकासासाठी प्रस्तावित किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यक्रमासंदर्भातील परतावे, निवेदने आणि इतर विवरण केंद्र सरकारला आवश्यकतेनुसार वेळोवेळी पुरवणे आवश्यक आहे.
- कायद्यातील तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करण्याचा केंद्र सरकारला अधिकार आहे आणि ते एका अधिसूचनेद्वारे असे करु शकते.

4. सरकारने सध्या विमा क्षेत्रात 26% थेट विदेशी गुंतवणुकीला (एफडीआय) परवानगी दिली आहे. स्थानिक खाजगी कंपन्या विदेशी भागीदारासोबत भागीदारी करु (जॉईंट व्हेंचर) शकतात ज्यामध्ये विदेशी भागीदाराचा हिस्सा 26% पर्यंत असू शकतो.